I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 315-320
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# विस्थापन व त्याच्या दूरगामी परिणामांचे विश्लेषणात्मक अध्ययन

मनोहर आनंदराव गुडधे
अर्थशास्त्र विभाग चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
*Corresponding Author: manojgudadhe5@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**

आधुनिक काळातील एक महत्त्वपूर्ण व गंभीर समस्या म्हणून विस्थापनाच्या समस्येकडे पाहिले जाते. मानवाने साध्य केलेल्या विकासाच्या कार्यातून व त्यातल्यात्यात नैसर्गिक आपत्ती या दोहोमधून मानव व मानवी समुदायावर विस्थापनाची स्थिती ओढावत असते. विस्थापन या प्रक्रीयेत मानवाला आपल्या वास्तव्याचे मुळ ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणी जावे लागते किंवा जाण्यास भाग पडते. यामूळे व्यक्तीला आपले उत्पन्नाचे साधन, जमीन व घराचे हक्क तसेच त्यांचे सामाजिक संबध यांना मुकावे लागते. विस्थापनाच्या नैसर्गिक कारणात भुकंप, महापूर, त्सुनामी, दुष्काळ, अतिवृष्टी तसेच ज्वालामुखी या घटकांचा समावेश होतो. तर धरणांची निर्मिती, ऊर्जा प्रकल्प, सेझ, खनिज उत्खनन प्रकल्प व वाढत्या गरजांची पुर्तता म्हणून मोठया प्रमाणावरील औद्योगीकरणाचा अवलंब इ. अशा बाबींचा मानव निर्मित कारणात समावेश होतो. अशातच यूद्ध व अलिकडच्या काळातील दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद इ. कारणामूळे सुद्धा मानवी जीवनात अस्थिरता निर्माण होऊन मानवावर विस्थापनाची पाळी येतांना दिसते विकासाच्या नावावर अनेक धरणे, कारखाने, महामार्ग, औद्योगीक वसाहती इत्यादीची निर्मिती होत असलीतरी मात्र त्यामुळे अनेक गावे उठवीली जातात व लोकांवर विस्थापीत होण्याची वेळ येते. विस्थापनात व्यक्तीला आपल्या मुळच्या जागेवरून जाणीवपूर्वक तसेच बळाच्या साहयानेही हटविले जाते. त्यामूळे लोकांचे आजवर अस्तित्वात असलेले सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन उध्वस्त होऊन व्यक्तींना मुळच्या पर्यावरणाऐवजी नवीन वातावरणाशी समायोजन साधने भाग पडते. विस्थापनाने आधुनिक काळात मानवी जिवनात अस्थिरता निर्माण करतांनाच अनेक गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. ज्याचे दुर्गामी परिणाम हे आरोग्य, शिक्षण, बेरोजगारी, मनोरंजनाचा अभाव, संस्कृतीचा ऱ्हास इ. अशा दृश्य स्वरूपात दिसत आहेत.

**बीजसंज्ञा :–** औद्योगिकरण, नैसर्गिक आपत्ती, पुनर्रवसन, स्थलांतर, संघर्ष, पर्यावरण, जीवनशैली, मानवी संबध.

## प्रस्तावना :–

स्वातंत्र्यानतंर भारतात विकास कार्याला गती प्रदान करण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न करण्यात आले. याच प्रयत्नाचाच एक भाग म्हणून भारतातील अनेक राज्यात औद्योगीक क्षेत्रे निर्माण करण्यात आली. शेतीप्रधान देश म्हणून शेती विकासाकरीता सिंचन प्रकल्पाच्या निर्मितीला चालणा देण्यात आली. त्यातुनच मोठ-मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले व धरणे बांधणीच्या कार्याला गतीमानता मिळाली मात्र ही विकासाची कामे ज्या – ज्या क्षेत्रात सुरू करण्यात आले किंवा सुरू करण्याचे नियोजन झाले त्या सर्वच क्षेत्रातील गावे उठविण्याचीही प्रक्रीया सुध्दा गतीमान झाली. पीढयान पीढया त्या क्षेत्रात राहत आलेला समूदाय हा त्या विकासकार्यात भरडला गेला. व अशा समुदायाला त्या क्षेत्र्ाातील आपले मुळचे गाव सोडुन इतरत्र जाणे भाग पडले. त्यामूळेच या समुदायावर विस्थापीत होण्याची अवकळा आली. किंबहुना तो समुदाय हा विस्थापीत झाला. यातुनच विस्थापन ही गंभीर बाब म्हणून प्रकर्षाने पुढे आली.

विस्थापन ही आधूनिक काळातील भारतातील व एकूणच संपूर्ण जगातील एक महत्त्वपुर्ण समस्या म्हणुन आज पूढे आली असली तरी मानवी समुदायाला मानवी कारणाबरोबरच काही नैसर्गीक कारणांमुळे सूध्दा आपले हक्काचे व वास्तव्याचे ठिकाण सोडुन दुसऱ्या ठिकाणी स्थंलातर करणे भाग पडले आहे. म्हणजेच मानव व मानवी समुदायाचे विस्थापन हे मानवाने विकासकार्य साधण्यातून तसेच नैसर्गीक आपत्तीतूनही झाले आहे. त्यामळेच व्यक्ती, व्यक्ती-समुह अथवा समदुाय यांना नैसर्गिक किंवा मानवी कारणामुळे आपले वास्तव्याचे मुळ ठिकाण सोडुन जेव्हा दुसऱ्या ठिकाणी जाणे भाग पडते तेव्हा या प्रक्रियेस विस्थापन म्हटले जाते. विस्थापनाची व्याख्या करतांना डॉ. जी सत्यनारायण म्हणतात की, "विस्थापन म्हणजे घर, जमिन, व्यवसाय सोडणे आणि पर्यायी व्यवसाय करणे, नविन घर करणे, आणि नविन नातेसंबध जोडणे आणि नवीन संस्कृती व पर्यावरणाशी समायोजन करणे होय. '' एकूणच विस्थापनामुळे त्यांचे सामाजिक संबध यांना मुकावे लागत असते.

**विस्थापनाची नैसर्गिक कारणे :-**

मानवी जीवनाच्या विकासाच्या अगदी प्रारंभापासूनच मानवाला नैसर्गिक कारणामुळे विस्थापन करावे लागले आहे. नैसर्गिक आपत्तीमूळे मानवी समाजाला विस्थापन करावे लागते व याची कारणे वेगवेगळी आहेत. यात प्रामुख्याने भूकंप, महापूर, त्सुनामी, दुष्काळ, अतिवृष्टी तसेच ज्वालामुखी या घटकांचा समावेश होतो.

नैसर्गिक विस्थापनामध्ये विस्थापीत होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणून भुकंपाकडे बघीतले जाते. भुकंपामूळे मानवहानी व वित्तहानी मोठया प्रमाणात होते. १९९३ मध्ये गुजरात येथील किल्लारी येथे झालेल्या भुकंपाच्या दुर्घटनेमुळे बचावण्यात आलेल्याचे विस्थापन करण्यात आले.

अतिवृष्टी व महापूर यामुळे नदी तसेच समुद्रालगत वास्तव्यास असलेल्या वस्तीना फटका बसतो. यामुळे मानवावर जशी आपत्ती ओढावते तसेच प्राणीही प्रभावित होतात. वारवांर अशी परिस्थिती असणाऱ्या भागातील लोकांचे त्यांच्या सुरक्षिततेसाठी पुणर्रवसनाच्या माध्यमातुन विस्थापन करावे लागते.

त्सूनामी या नैसर्गिक लाटाची निर्मिती होऊन या प्रचंड लाटामुळे समूद्रतळावरील मानवी जीवन व्यापक स्तरावर प्रभावीत होत असतो. या लांटाचे दुष्परीणाम दिर्घकाळपर्यंत समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या मानवी समुदायाला भोगावे लागते. यात कित्येक लोकांची घरे व्यवसाय आणि जीवनमान विस्कळीत होते. या त्सुनामी लांटाच्या भीतीपोटी त्यांच्या मुळ ठिकाणाहुन दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी विस्थापन करावे लागते.

एखाद्या भागातील वांरवार पडणाऱ्या दुष्काळामूळे अशा दुष्काळगस्त भागातील लोक, प्राणी , अन्न - धान्याच्या शोधामध्ये

स्थलांतर करतात. दुष्काळामुळे जनजीवन विस्कळीत होऊन त्यामुळे मानवसमाज मोठया प्रमाणावर प्रभावित होतो.

**विस्थापनाची मानवनिर्मिती कारणे :-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतामध्ये शासनाद्वारे विविध विकास प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहीत करण्यात आली. त्यामुळे विकासासाठी किंवाविकासांच्या कामाखाली अनेक लोकांना विस्थापीत होण्याची वेळ येते.

शेतीच्या विकासासाठी तसेच पीण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी मोठ मोठया धरणांची निर्मिती करण्यात येते. यात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन केल्या जातात. तसेच गावे सुध्दा उठविली जातात. त्यामुळे अशा समुदायांवर विस्थापीत होण्याची वेळ येते.भारतात सर्वात अधिक विस्थापीतांची संख्या ही धरणांच्या बांधकामामुळे झालेली आहे.

राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी उर्जा प्रकल्प, सेझ, पवन उर्जा, खनिज उत्खनन प्रकल्प अशी अनेक प्रकल्प हाती घेतली जातात. वाढत्या गरजांची पूर्तता व उत्पादनातील वाढीसाठी औद्योगीकरणालाही गती दिली जाते. यात प्रकल्पाच्या माध्यमातून मुळ निवासी हे निर्वासीत होतात तर औद्योगीकरणातुन शहरालगतच्या जमिनी वस्त्याखाली किवा कारखाण्याखाली येतात त्यामुळेअशा ठिकाणी वास्तव्यास असलेल्या जमिनी संपादीत करून त्यांना दुसरीकडे विस्थापीत करण्यात येत असते.

मानवी संघर्षाच्या इतिहासाचे आकलन केल्यावर युध्दामूळे मानवाचे विस्थापन झालेले प्रत्ययास येते. सामान्यता युध्दजन्य परिस्थिती असणाऱ्या भागातील लोक ही स्वत:च्या सुरक्षेसाठी स्थलांतर करतात. त्यातच अलिकडच्या काळातील दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद अशा विविध कारवायांनी मानवी जीवनामध्ये अस्थिरता निर्माण होत आहे. यामुळेही मानवी सुरक्षेतुन लोक स्थंलातंर करतात. किंबहूना विस्थापतही होतात.

अशाप्रकारे नैसर्गिक किवा मानवी कृतीमूळे जर समुदायाला आपली जागा, इतिहास, संस्कृती, आप्तेष्ठ यांना सोडावे लागले किंवा वास्तव्य असलेली अशी जागा सोडण्याची प्रक्रिया म्हणजे विस्थापन होय. एकीकडे विकासासाठी विकास प्रकल्प हाती घेतले जातात. तर दुसरीकडे मात्र या प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जागेकरिता त्या जागेवर असणाऱ्या लोकांना आपली वडीलोपार्जीत व वंशपरपरेने चालत आलेली जागा विकासाच्या त्या प्रकल्पाकरीता सोडावी लागते. त्यालाच सोप्या भाषेत विस्थापन असे संबोधण्यात येते. स्वातंत्र्यानंतर भारतात औद्योगीक विकास व शेती विकास यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. देशाच्या मागासलेल्या क्षेत्रामध्ये विविध विकास प्रकल्प सुरू करण्यात येऊन देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर भर देण्यात आला. यात शेती विकासाकरिता सिंचन प्रकल्प निर्मितीला सुरूवात झाली.

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 315-320
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

पंजाबमधील भाक्रानांगलधरण, ओरीसातील हिराकुंड, गुजरात येथील उकाई धरण, महाराष्ट्रातील कोयणा धरण, जायकवाडी धरण, गोसेखुर्द प्रकल्प तसेच पश्चिम बंगालमधील दामोदर खोरे योजना अशा विविध प्रकल्पामुळे त्या–त्या क्षेत्रातील लाखो लोकांना आपल्या वास्तव्याचे ठिकाण सोडावे लागले. विविध प्रकल्पाच्या माध्यमातून विजनिर्मीती केंद्र, धरणे, कारखाण्याची निर्मिती, महामार्गाची निर्मिती तसेच विशेष औद्योगीक वसाहती इ. चे निर्माण होत असले तरी मात्र त्यामुळे या ठीकाणची अनेक गावे उठवली जातात. अशातच त्यांना विस्थापीत व्हावे लागते.

औद्यागीक प्रकल्प मोठ–मोठी धरणे, खाणी आणि औद्योगीक क्षेत्रासाठी त्या परिसरातील गावे उठविली जातात. जे लोक वार्षानूवर्षे ज्या गावात वास्तव्यास होते ते वास्तव्याचे ठिकाण त्यांना सोडण्यास भाग पडते. त्यामुळे एक मोठा समुदाय आपल्या मूळ गावातून विस्थापीत होतो. त्या गावातील लोकांनी गाव सोडण्यास विरोध केल्या नंतर त्यांना जबरदस्तीने विस्थापन करण्यास भाग पाडले जाते. यात विविध प्रकारची आमिषे दाखवीण्यासोबतच बळाचा वापर करूनही संबधीत लोकांना गाव सोडण्यास प्रवृत्त करण्यात येते. त्यामुळे आज विस्थापनाच्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केले आहे. साधारणता: विस्थापनाची समस्या ही विकासाच्या प्रक्रियेतून निर्माण झाली. यात व्यक्तीला आपल्या मुळच्या जागेवरून जाणीवपुर्वक तसेच बळाच्या साहयानेही हटविले जाते. त्यामुळे लोकांचे आजवर अस्तित्वात असलेले सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन उध्वस्त होऊन व्यक्तींना मुळच्या पर्यावरणाऐवजी नवीन वातावरणाशी समायोजन साधने भाग पडते.

भारतातील अनेक विकासाच्या प्रकल्पामध्ये प्रामुख्यने जंगलात वा मानवी वस्तीतही अनादी काळापासुन राहत आलेला आदिवासी समुदाय विस्थापीत झाल्यामुळे या समुदायाच्या दृष्टिने नव्या व वेगळया वातावरणात राहने ही त्याच्या दृष्टिने अतीशय दु:खद बाब ठरली. विस्थापीतांच्या संदर्भात दिल्ली येथील ‘पदेजपजनजम वf नतइंद ।ींिपते’या संस्थेने केलेल्या एका अध्ययनात नर्मदा खोरे विकास प्रकल्पात एकंदर दहा दक्ष लोक विस्थापीत झाल्याची नोंद आहे. त्यातच (न्छम्ैब्) ने केलेल्या आदिवासी क्षेत्रातील औद्योगीकीरणाच्या अध्ययनात त्यांना असे निदर्शनास आलेली, विस्थापनाचा परिणाम सर्वात जास्त व गंभीर स्वरूपात हा या आदीवासींच्या जीवनावर झालेला आहे. मोबदल्याच्या स्वरूपात या आदीवासींना जमिन व निवासासाठी घराची उपलब्धता झाली असली तरी मात्र त्यांचे पंरपरागत व्यवसाय, शेतजमिनी, घरदार व त्यांच्या अनोख्या जीवनशैलीपासुन विन्मुख व्हावे लागले. त्यातील अनेक आदीवासी हे औद्योगीक क्षेत्रात अकुशल मजुर म्हणून

काम करतात. अशातच त्यांच्या परंपरागत उत्पादनाची साधने नष्ट होऊन त्यांना तुटपुंज्या उत्पादनात आहार व आरोग्याची योग्य ती काळजी घेता आली नसल्याने अशा विस्थापीतात व प्रामुख्याने त्यांच्या बालकांच्या मृत्युचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले.

विकास प्रकल्पामूळे निर्माण होणाऱ्या विस्थापीतांच्या समस्येच्या निवारणार्थ शासन स्तरावरून उपाययोजना त्यांचे रक्षण करण्यासाठी शासन स्तरावर विविध कायदे व वरतूदी करण्यात आलेल्या आहेत. विशेषत: मोठया प्रकल्पाच्या निर्मितीला सुरूवात करण्यापूर्वी शासनस्तरावरून पुनर्वसन अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. एकूणच एकीकडे प्रकल्पाच्या कार्याला सुरूवात होते तर दुसरीकडे त्याचवेळी पूनर्वसन अधिकारी विस्थापीतांच्या प्रश्नांना मार्गी लावण्याचे काम करीत असतो. या माध्यमातून विस्थापीतांचे पूनर्वसन योग्य प्रकारे झाले तर त्यांच्या बऱ्याच समस्याचे निराकरण होऊन त्याचे प्रश्नही मार्गी लागत असतात. मात्र शासकीय कामातील दप्तरदिरगांई, लालफीतशाही, अकार्यक्षमता व भ्रष्टाचार यामूळे विस्थापीताची अगोदरच गंभीर असलेली बाब तीव्र बनत असते व यातूनच अनेक समस्यांचा जन्म होत असतो.

**विस्थापनाचे दुरगामी परिणाम :-**

मानवी जीवनात अस्थिरता निर्माण करतांनाच विस्थापनाने आधुनिक काळात गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. ज्याचे दुरगामी परिणाम आज दृश्य स्वरूपात दिसत आहेत.

प्रकल्पग्रस्त विस्थापीतांना त्यांच्या निवासाकरिता इतर जागांची उपलब्धता करून देण्यात येते. घरे बांधुन दिले जात नाहीत. मिळालेल्या आर्थिक मोबदल्यात विस्थापीतांना घराची उभारणी करणे शक्य होत नाही त्यामुळे अशा विस्तापीतांसमोर निवाऱ्याचा प्रश्न आवासून उभा राहतो.

विस्थापनाचा प्रक्रियेमध्ये प्रकल्पग्रस्तांनी शेतजमीन, घरे प्रकल्पात जातात व ते स्थावर मालमत्तेपासुन वंचित होतात. त्यांच्यावर विस्थापीतांची पाळी येते. अशावेळी त्यांच्या मालमत्तेचे उचीत मुल्यमापन करून त्याची नूकसान भरभाई आणि ती सुध्दा वेळेवर देणे करणे अगत्याचे ठरते. मात्र अनेक प्रकल्पामध्ये कित्येक वर्षे लोटुन सूध्दा त्यांना भरपाई मिळत नाही. परिणामी विस्थापीतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

विस्थापीतांचे पुनर्वसन झालेल्या वसाहतीमध्ये पाणी, आरोग्य, शिक्षण तसेच मनोरंजनाच्या सोयी व इतर नागरी सूविधा यांची उपलब्धता करणे आवश्यक ठरते. मात्र या गरजांची पुर्तता ही पुरेशा प्रमाणात करून दिल्या जात नाही त्यामुळे अशा वसाहतीत राहणाऱ्या लोकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

विस्थापीत झालेल्या समुदायाला ते ज्या क्षेत्रात वास्तव्यास जातात त्या क्षेत्रात उदर

निर्वाहासाठी जमीनीच्या मोबदल्यात जमीन' या तत्वावर शेती योग्य जमीनीची उपलब्धता करण्यास शासनाची कटीबध्दता आणली जाते. कारण विस्थापीत झालेल्या बहुतांश लोकांचा व्यवसाय हा शेतीच असतो. तरीपण हे तत्व प्रत्यक्षात आणले जात नाही. त्यामूळे अशा समुदायासमोर उपजीवीके सारखा गंभीर प्रश्न निर्माण होतो. विस्थापीत लोक हे आर्थिकदृष्टया दुर्बल बनत असतात. त्यांचा आर्थिक दर्जाचा ऱ्हास होत असतो. पुनवर्सन झालेल्या क्षेत्रात नव्याव्यवसायाची उभारणी करणे शक्य झाल्यास त्यातच अकुशल मजुरांना कामासाठी खुप अंतरावर जावे लागत असल्यास उपजीवीकेसाठी अविरत संघर्ष करण्याची वेळ अशा विस्थापीतांवर येत असते. त्यातच पुरेश्या पैशा अभावी आर्थिक संकटही ओढावत असते. विस्थापीतावर आर्थिक संकटाबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक संकटानांही तोंड द्यावे लागते. विस्थापनाच्या प्रक्रियेतून एखाद्या समुदायाची पांरपारीक जीवनपध्दती, सामाजिक संस्था तसेच सांस्कृतिक चालीरीती विस्कळीत होतात. परिणामी विस्थापीत झालेल्या लोकसमुदायाच्या सर्वांगीण विकासास अनेक अडथळे निर्माण होतात.

**निष्कर्ष :-**

मानवी जीवनातील चैनीला आणि भौतकवादी चंगळवादाला महत्त्व प्राप्त होऊन एकांगी विकास साधण्याच्या प्रकल्पामूळे मानवी समुदायातील मोठया समुदायाला विस्थापना सारख्या गंभीर समस्येला आज सामोरे जावे लागत आहे. विविध प्रकल्पाामूळे अशा समूदायाचे अस्तित्वच नष्ट होत आहे. दूसऱ्यांच्या विकासासाठी त्यांना दारीद्रयमय जीवन जगावे लागते आहे. मुळ संस्कृती, उपजीवीकेची साधने यापासुन त्यांना कोसो दुर जावे लागत आहे. समाजाच्या एका धृवाच्या सोयीसाठी दुसऱ्या धृवाची होणारी गैरसोय म्हणजे विकास हे नक्कीच अन्यायकारक ठरते. ज्यांच्यासाठी मानव वासीयांनी स्वत:ची साधन संपत्ती, गाव, समाजजीवन, संस्कृती इत्यादीचे बलीदान करावयाचे तो प्रकल्प खरोखरच सार्वजनीक हितासाठी आहे की, नाही हे तपासून पाहण्याचा विस्थापीतांना हक्क आहे. याच व्यापक जाणीवेतून विस्थापीतांच्या प्रश्नासाठी चळवळी उभारल्या जाऊन विविध प्रकल्पांना संघटीत रित्या विरोध होऊ लागला आहे.

**संदर्भ :-**

डॉ. कऱ्हाडे बि. एम., जुन २०१३, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

लोटे रा. ज., सप्टेबंर २००२, ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

निर्देशिका, २००५, महिला व बालविकास विभाग मंत्रालय मुबंई यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी, पुणे.

सौ. क्षीरसागर शोभा देवी, २०१३, द्वारा प्रकाशीत, समग्र मानवी हक्क, के सागर पब्लीकेशन्स पुणे..

https://mr.wikipedia.org